## प्रकरण चौथे

आद्य मराठी ग्रंथकार कोण ? याची चर्चा, मराठीतील पहिली आख्यान कविता, आख्यान काव्य म्हणजे काय ? त्याचे स्वरूप, मराठीतील पहिले आख्यान काव्य धावळे

# प्रकरण चौथे

## आद्य मराठी ग्रंथकार कोण ? याची चर्चा, मराठीतील पहिली आख्यान कविता, आख्यान काव्य म्हणजे काय ? त्याचे स्वरूप मराठीतील पहिले आख्यान काव्य धवळे

### आद्य मराठी ग्रंथकार कोण ?

महाराष्ट्र हे शूरांचे वीरांचे तसेच संतांचे आणि महंतांचे आहे. अशा प्रकारची त्याची ख्याती गाईली गेली आहे. "शुध्द बीजापोटी फळे रसाळ गोमटी" या न्यायाने मराठी साहित्यात प्रथम जे कांही निपजले असेल ते रसाळ आणि गोमटेच असेल. नदी तिच्या उगमी नेहमी शुध्द, पवित्राच असते, पुढे तिच्या ओघात इतर प्रवाह येऊन मिसळतात. आणि ती दूषित होत जाते. जे नदीचे तेच भाषेचे आणि वाङ्मयाचे सात्त्विकांच्या कड्यावर उगम पावणारी मराठी वाङ्मयाची सरिता तिच्या प्रारंभीच्या काळात शुध्द सात्त्विकच होती. हे निर्विवाद आहे. वाद आहे तो तिचा प्रथम निर्माता कोण ? मराठी वाङ्मयाच्या इतिहासात तो मान कोणास द्यावयाचा हा एक मतभेदाचा विषय होऊन बसला आहे. आतापर्यंत तर तो मान मुकुंदराजांना देण्यात आलेला आहे. त्यांचा "विवेकसिंधू" हा मराठी भाषेत रचिलेला आद्यग्रंथ होय. असा आजपर्यंतचा सर्वसाधारण समज आहे. सर्वसाधारण म्हणण्याचे कारण त्याला कांही अपवाद आहेत. विशेषत: वि.का. राजवाडे यांनी, त्यांच्या मते शके ९६१ मध्ये लिहिलेली "ज्योतिषरत्नमाला मराठी टीका" उजेडात आणल्यावर "शके अकरा दाहोतरु" मध्ये रचिलेला "विवेकसिंधू" मागे पडावा हे ओघानेच आले" पण "ज्योतिषरत्नमाला" टीका गद्यात असल्यामुळे पद्यबध्द "विवेकसिंधू"चे काव्याच्या क्षेत्रात पहिलेपण टिकून राहिले. पण हे पहिलेपण त्याला फार काळ लाभले नाही. कारण त्यानंतर लौकरच संशोधकांनी, तोपर्यंत सांकेतिक लिपीच्या

कुलपात अडकून राहिलेले महानुभावपंथाचे ग्रंथ प्रकाशित करण्यास आरंभ केला व त्यामुळे सरस्वतीच्या या अज्ञात दालनात कांही मौल्यवान रत्ने होती. त्यातील एक रत्न, म्हणजे महदंबा. असल्याचे अभ्यासकांना आढळून आले. त्यातील एक महदंबेच्या नावाचे होते व ते म्हणजे तिने स्वत: रचून गायिलेले "धवळे" किंवा विवाहगीते. ही गीते तिने महानुभाव पंथाच्या पंचकृष्णापैकी एक जे रिधपूरचे "गुंडम राउळ" किंवा गोविंदप्रभू त्यांच्या कृतक विवाहप्रसंगी गायिली होती. त्यावरून महदंबेने हे "धवळे" गोविंदप्रभूंच्या निर्वाणापूर्वी म्हणजे इ.स. १२८७ च्या पूर्वी रचिलेले असणार असे संशोधकांचे मत आहे.[२] आता मुकुंदराजांच्या "विवेकसिंधू"चा रचनाकाळ जर लवचिक असेल तर मग निदान काव्याच्या क्षेत्रात तरी पहिलेपणाचा मान या महदंबेला का देऊ नये ? असे अभ्यासकांना वाटले. साहजिकच होते व त्याप्रमाणे तिचे धवळे "धवळे" म्हणून प्रसिध्द न होता "आद्य मराठी कवयित्री" या नावाने प्रसिध्द झाले.[३] वरील मत, संदेह निर्माण करणारे आहे. त्यातून महदंबा ही केवळ "आद्य मराठी कवयित्री" की आद्य "ग्रंथकार" हे स्पष्ट होत नाही. तसेच, तिने हे धवळे इ.स. १२८७ च्या पूर्वी म्हणजे नेमके केव्हा रचिले ते कळण्यासही कांही मार्ग नाही. महानुभाव पंथाचे आद्य प्रवर्तक चक्रधरस्वामी यांचे निर्याण इ.स. १२७४ मध्ये झाल्यावर त्यांचे भक्त रिधपूरला गोविंदप्रभूकडे येऊन राहिले व त्यानंतर केव्हा तरी धवळ्यांची रचना झाली. म्हणून त्यांच्या संपादकांनी त्यांचा रचनाकाळ "शाके १२०८ पूर्वी केव्हातरी" ठरविला आहे.[४] अर्थात त्यांची कर्ती महदंबा ज्ञानदेवपूर्व ठरते. पण म्हाइंभटानी संकलित केलेले चक्रधरांचे "लीळाचरित्र" त्याच्याही मागे जाते. त्याची रचना चक्रधरांच्या निर्याणानंतर लौकरच झाली असे महानुभावांचा "इतिहास" सांगतो.[५] इ.स. १२७८ हा "लीळाचरित्रा"चा रचनाकाळ म्हणून आता बहुतेक सर्वांना मान्य आहे. याचा अर्थ, तो आद्य मराठी ग्रंथ ठरतो व पहिला मराठी गद्य ग्रंथकार म्हणवून घेण्याचा मान म्हाइंभटाकडे जातो. पण आश्चर्य हे की, ज्यांच्या

"लीळाचरित्रा"ला हा पहिलेपणाचा मान मिळत आहे. ते स्वत: चक्रधर-स्वामीच आद्य मराठी ग्रंथकार होत. असे मत पुढे येत आहे. चक्रधरस्वामी वास्तविक पाहता सर्वस्वाचा त्याग केलेले एक विरक्त संन्यासी. त्यांच्या "लीळाचरित्रा"तच त्यांच्या या विरक्त वृत्तीवर प्रकाश पाडणारी एक सुंदर लीळा आहे. एकदा एका लग्नप्रसंगी "चक्रधरस्वामी पाहुणे कुणाचे ? वरपक्षाचे की वधूपक्षाचे ?" असा प्रश्न उपस्थित झाला असताना त्यांनी जे उत्तर दिले ते त्यांची वृत्ती दाखविते. ते म्हणाले, "हें तुमचे नव्हे : याचे नव्हे : हे कव्हणाचे ही नव्हे"[६] पण कोणाविषयीच ममत्व न धारणाऱ्या अशा विरक्त पुरुषालाही "मम" म्हणणारे असतातच. ते त्यांचा समाजसुधारक, समताप्रस्थापक दर्शनकार इतकेच नव्हे तर ग्रंथकारही करतात. चक्रधरांना विशिष्ट पध्दतीने गोष्टी सांगण्याची कला अवगत होती, त्यांनी सांगितलेल्या कांही गोड गोष्टीही "लीळाचरित्रा"कारांनी आपणास ऐकविल्या आहेत, हे सर्व खरे, पण तेवढयामुळे ते "आद्य मराठी कथाकार" होत नाहीत. पण डॉ. द.भि. कुलकर्णी त्यांना ही पदवी देतात इतकेच नव्हे तर तिचे समर्थनही करतात.[७]

आतापर्यंत बहुतेक सर्वांनी "चक्रधरांचा एकही ग्रंथ नाही" असेच म्हटंले आहे. पण डॉ. कोलते याला अपवाद आहेत. त्यांच्या मते वरील विधान अगदीच चुकीचे नसले तरी ते एकांगी आहे. कारण त्यांच्या दृष्टीने "चक्रधर हे ग्रंथकार होते."[८] ग्रंथ म्हणजे काय या प्रश्नाचा विचार करून व एकाने सांगून दुसऱ्याने लिहून काढलेल्या ग्रंथांची उदाहरणे देऊन "लीळाचरित्रा"चा "एकांक" हा भाग "सूत्रपाठ" व "दृष्ठान्तपाठा"तील सूत्रे व त्यावरील दृष्टान्त यांचे कर्तृत्व त्यांनी चक्रधराकडे दिले आहे. ज्ञानेश्वरीचा "लेखक" सच्चिदानंदबाबा असला तरी ती जशी ज्ञानेश्वरांची आहे किंवा विनोबा भावे यांची "गीताप्रवचणे" जरी साने गुरुजींनी लिपीबध्द केली असली तरी ती जशी त्यांची नव्हती,

त्याचप्रमाणे चक्रधरांच्या तोंडची सूत्रे केशिराजांनी, व त्यांनी सांगितलेल्या आपल्या आयुष्याच्या "एकांक" भागातील आठवणी म्हाइंभटांनी संग्रहित केल्या म्हणून ते त्यांचे निमाते ठरत नाहीत. याच संदर्भात ग्रीक वाङ्.मयातील "अँपॉलाजी" या विवाद प्रकरणाचा दाखला देऊन ("अँपॉलाजी कोणाचे सॉक्रेटिसाचे की प्लेटोचे ?") "सूत्रपाठ" चक्रधरांच्या नावाने ओळखला पाहिजे असे डॉ. कोलते आग्रहाने प्रतिपादितात. त्यांच्या म्हणण्यात तथ्यांश असला तरी ते संपूर्णपणे मान्य होण्याजोगे नाही. कारण मग जो कोणी लीळा किंवा आठवणी सांगतो तो त्यांचा कर्ता अशी भूमिका पत्करावी लागेल. त्यालाही हरकत नाही, पण प्रश्न असा की चक्रधरांनी "एकांक" भागातील आठवणी सांगितल्या तेव्हा किंवा निरूपणाच्या ओघात सूत्रावजा वाक्ये उच्चारली तेव्हा आपण वाङ्.मयनिर्मिती करीत आहोत अशी जाणीव त्यांना होती किंवा काय ? या प्रश्नाचे उत्तर "नव्हती" असेच द्यावे लागेल. ते सहज एखादी आठवण सांगून गेले किंवा एखादे सूत्रबध्द वाक्य बोलून गेले. केशिराज किंवा म्हाइंभट नसते तर या आठवणी आणि ही वाक्ये वाऱ्यावर विरून गेली असती आणि "सूत्रपाठ" किंवा "लीळाचरित्रा"चा "एकांक" आपणास दिसलाही नसता तेव्हा चक्रधरांनी आद्य मराठी ग्रंथकार ठरवून "सूत्रपाठा"चे कर्तृत्व त्यांच्याकडे देणे बरोबर नाही ते कर्तृत्व मुख्यत: केशिराजांचेच आहे. वाङ्.मये-तिहासात "चक्रधरोक्त सूत्रपाठ" केशिराजांच्या नावावर नमूद होतो ते योग्यच आहे.

सारांश, पहिला मराठी ग्रंथ या नावाच्या पदासाठी आतापर्यंत "ज्योतिष रत्नमाला", "विवेकसिंधू", "धवळे" आणि लीळाचरित्र" या चार ग्रंथांची नावे आपणापुढे आहेत. पण आद्य मराठी ग्रंथकार या पदासाठी मात्र एक नांव अधिक आहे आणि ते म्हणजे चक्रधरांचे, म्हणजे चार ग्रंथ आणि पाच ग्रंथकार एकाच पदावर आपला हक्क सांगू पहातात असे हे लोक विलक्षण

दृष्य आहे. "बारा पुरभय्ये आणि तेरा चुली" या म्हणीची आठवण करुन देणारेपैकी चक्रधरांना ग्रंथकार म्हणता येईल काय ? या प्रश्नाचे उत्तर वर दिलेच आहे. "ज्योतिष-रत्नमाला" ही त्याच ग्रंथावरील मराठी टीका श्रीपतीच्या हातची नसून ती नंतरच्या काळात कोणीतरी लिहिलेली आहे असे डॉ. कोलते यांनी सप्रमाण सिध्द केल्याने ती उत्तरकालीन ठरते. व प्रस्तुत स्पर्धेतून आपोआपच बाजूला होते. "विवेकसिंधू" हा मराठीतील आद्य ग्रंथ नाही इतकेच नव्हे तर तो "ज्ञानेश्वरी"नंतर पाच पन्नास वर्षांनी लिहिलेला आहे, असा विचार पुढे त्या प्रकरणी सप्रमाण मांडला आहे. त्यामुळे मुकुंदराजही आपल्या ग्रंथासह दूर होतात. आता उरले दोन ग्रंथ. "महदंबेचे धवळे" आणि म्हाइंभटांचे "लीळाचरित्र" या दोन वृत्तीचे स्वरूप केवळ नव्हे तर त्यांच्या निर्मितीमागील प्रेरणाही भिन्न आहेत. "धवळे" उत्स्फूर्त आहेत. "लीळाचरित्र" संयोजित आहे. एक काव्य आहे, दुसरे गद्य आहे. "धवळे" गाण्यासाठी आहेत, "लीळाचरित्र" वाचनासाठी, मननासाठी आहे. "धवळ्या"चा पूर्वार्धच तेवढा गोविंदप्रभूच्या वेळी रचिलेला असून तेवढाच विचारात घेणे योग्य होईल. त्यात प्रत्येकी चार चरणांची अशी अवघी ८३ कडवी आहेत. याच्या उलट "लीळाचरित्रा"च्या कोलते-प्रतीतील लीळांची संख्या बाराशेच्या वर जाते. धवळ्यांत रुक्मिणी स्वयंवर कथेचे भावपूर्ण निवेदन आहे, तर लीळाचरित्रात एका परमेश्वरी अवताराच्या लीळांचे संस्मरण आहे. या दोन कृतीत इतके व इतक्या प्रकारचे अंतर असल्याने त्यांची एकमेकांशी तुलना करणेच हास्यास्पद होईल. पण येथे प्रश्न तुलनेचा नसून त्यांच्या निर्मितीकाळाचा आहे. वर म्हटल्याप्रमाणे "लीळाचरित्रा"चा पहिला खारडा इ.स. १२७८ च्या सुमारास तयार झाला. ही गोष्ट आता सर्वमान्य होऊ पहात आहे. "धवळे" अर्थात त्यांचा पूर्वार्ध, शाके १२७४ ते १२८७ च्या मध्यंतरीच्या काळात निर्माण झाले हे निश्चित. प्रश्न इतकाच की "लीळाचरित्रा"च्या आधी की मागाहून ? चक्रधरांच्या पश्चात

त्यांची भक्तमंडळी रिधपूरला गोविंदप्रभूकडे आल्या आल्या त्यांनी हे विवाहाचे नाटक केले असेल तर त्या प्रसंगी महदंबेने गायिलेले "धवळे" लीळा-चरित्रा पूर्व ठरतील व त्यांना पहिलेपणाचा मान प्राप्त होईल. पण तसे झाले असेल असे वाटत नाही. कारण "गोविंदप्रभूचरित्रा"तील त्यांच्या लीळा स्थूलमानाने कालक्रमानुसार सांगितलेल्या असून धवळे गायिल्याची "विव्हा-वोस्विकारु" ही लीळा चरित्राच्या शेवटी शेवटी येते. त्यांच्या एकूण ३२३ लीळांत तिचा क्र २२४ वा आहे. ही वस्तुस्थिती पाहता गोविंदप्रभूंनी विवाहस्वीकाराचा सोहोळा मरण्यापूर्वी कांही दिवस अगोदर केला असे मानता येते. हे अनुमान बरोबर असेल तर धवळ्यांची रचना गोविंदप्रभूंच्या निधनाच्या वर्ष-दोन वर्षापूर्वीची असणार. त्यांचे संपादक वा.ना. देशपांडे जेव्हा म्हणतात की "शके १२०८ च्या पूर्वी केव्हातरी पूर्वार्ध निर्माण झाला[१] तेव्हा त्यांना दहाबारा वर्षांचा प्रदीर्घ काळ सुचवावयाचा नसून वर्ष-दोन वर्षांचाच सुचवावयाचा असेल.

सारांश, मराठीतील आद्य ग्रंथकार कोण याविषयी एकंदर परिस्थिती विचारात घेता म्हाइंभटाचे लीळाचरित्र हाच मराठी भाषेतील लिहिलेला आद्य ग्रंथ ठरतो. लीळाचरित्रातच धवळ्यांचा समावेश झाला असल्यामुळे धवळे हे काव्य आद्य काव्य ठरते आणि म्हणूनच महदंबा ही मराठीतील आद्य कवयित्री आहे.

## धवळ्यांची प्रेरणा:

मराठीतील पहिली आख्यान कविता म्हणजे "धवळे" होय आणि त्याचीच निर्माती महदाइसा ही मराठीतील पहिली आख्यान कवयित्री आहे. मराठीतील पहिले आख्यानकाव्य एका प्रतिभासंपन्न, चर्चक, जिज्ञासक, पृच्छक, अशा स्त्रीकडून निर्माण व्हावे आणि तेही लग्नात गाईले जात असलेले धवळे

हे होय. ही घटना मराठी आख्यान काव्याच्या दृष्टीने मोठी अर्थपूर्ण आहे. धवळे हे रूढ अर्थाने गायिले जात असलेला एक गेय वृत्त प्रकार आहे. ज्यात एखाद्या पुरूषाची धवल म्हणजेच 'बैल' याशी श्रेष्ठ अशी तुलना करून स्तुती केलेली असते. असा महदंबेच्या दृष्टीने श्रेष्ठतम् म्हणूनच धवळी गाईन गोविंदराणा अशी ती म्हणते. यावरून असे दिसते की लोकगीतात रूढ असणाऱ्या "धवल" या वृत्ताची गेयता आणि कृष्णासारख्या श्रेष्ठाच्या जीवनातील आख्यायिका या दोहोंचा मिलाफ मराठीतील या पहिल्या आख्यान कवितेपासून झाला आहे.[१०]

मराठीतील आद्य कवयित्री पदाचा मान मिळवणाऱ्या महदाइसाची काव्यनिर्मिती ही उत्स्फूर्त आहे. एके दिवशी गोविंदप्रभूचे सर्व भक्तजन भिक्षेकरता गेले होते तेव्हा एक तेलीन वधूवरांची बाशिंगे घेऊन जात होती हे महदाइसेने पाहिले व ती तेलीनीला म्हणाली, "अग तेलीनी आमुच्या गोसावीयाकरता बाशिंग दे. तेव्हा तिने आणखी एक चांगले बाशिंग केले आणि गोविंदप्रभूंच्या श्रीमुकूटावर बांधिले. तेव्हा गोविंदप्रभू म्हणाले आवो मेली जाय : काकण बांधा म्हणे,: डाऊ बांधाया म्हणे : हळदी उठावे म्हणे तुरे वाजवावे म्हणे : तूपे पऱ्हावे वहायावे म्हणे : बोणे करावे म्हणे : मांडो घालावा म्हणे आणि तशी तयारी सुरु झाली. इश्वरनायकाने आपली कन्या देऊ केली. सर्वांना जेवनावळ घातली मग महदंबेने धवळे गाईले. गोसावी तिला म्हणाले आवो मेली जाय : गाय गाय म्हणे तेव्हा महदंबा गोविंदप्रभूंना म्हणाली काई गावोजी ? गोसावी म्हणाले "आवो कृष्णरुक्मिणी गाय म्हणे : तुरया थाट गाय म्हणे आणि महदाइसेला स्फूर्ती झाली. इतुकेन रुक्मिणी स्वयंवर गावोंचि लागली. निरुता लागला जीवी हे कडवे गाइले.[११] अशा पध्दतीने मराठीतील पहिले स्त्री काव्य उत्स्फूर्तपणे गाइले गेले. परम दैवत गोविंदप्रभूंची आज्ञा आवडता विषय योग्य वातावरण यातूनच रुक्मिणी स्वयंवर या काव्याचा जन्म झाला.

व या काव्य श्रवणाने गोविंदप्रभु तन्मय झाले. त्यांची तहानभूकच हरवली. अशा प्रकारे हे रुक्मिणी स्वयंवर धावळ्याच्या रूपाने चार दिवस गायिले गेले. आणि मग प्रवृत्ती झाली. लग्नात वराला "धावा" असे म्हटले जाते व त्याच्यासाठी गायिले गेलेले गीत म्हणजे धावळे होत व हेच मराठीतील पहिले आख्यान काव्य म्हणून ओळखले जाते.

महदाइसा ही महानुभावपंथाचे आद्य आचार्य नागदेव यांची चुलत बहिण होय. ती चक्रधरांनाही जिज्ञासक, आणि चर्चक वाटणारी होती. तिचा अधिकारही तितकाच होता. तिच्यात काव्यशक्ति उपजत असावी त्यामुळेच तिने उत्स्पूर्तपणे कांही ओव्या गायिलेल्या आढळतात. परंतु तिच्या काव्यशक्तिचा खरा प्रत्यय येतो तो तिच्या धावळ्यात द्वारकेच्या नाग-याकडून कृष्णाचे पवाडे ऐकून भिमकीच्या मनात त्याचे वेध लागल्यापासून तो श्रीकृष्ण रुक्मिणीचा विवाह समारंभ यथासांग होईपर्यंतचा वृत्तात महदंबेने थोडक्यात पण अत्यंत समर्थपणे वर्णिला आहे. कृष्ण आणि रुक्मिणी यांना अवतारी व्यक्ती म्हणून जरी ती मानीत असली तरी दैवी गुणापेक्षा मानवी पणालाच महत्त्व मिळाले आहे हे धावळे गात असताना महदंबेच्या ठिकाणी असलेल्या विविध गुणांचे मनोदर्शन आपणाला होते. या धावळ्यात तिने कृष्णरुक्मिणी विवाहाची कथा काव्यातून कथित केलेली आहे आणि म्हणूनच महदंबा ही मराठी काव्यातील आद्य आख्यान कवयित्री म्हणून ओळखली जाते.

मराठी आख्यान कवितेच्या प्रारंभीचे तिचे रूप हे अशा प्रकारचे आहे. आध्यात्मिकता व कथात्मकता या दोन धाग्यांनी ते गुंफले गेले आहे. आध्यात्मिकता परमेश्वराविषयीच्या नितांत वाटणा-या भक्तिभावनेतून व्यक्त झाली आहे तर त्यातील कथात्मकताही देवादिकांच्या पौराणिक आख्यानाची निवड करते. मात्र निवडलेल्या आख्यानाचे कथन करताना त्यावर आध्यात्माची कुरघोडी न करता त्याची निर्मिती करणे आवश्यक आहे. तरच हे कथन

काव्यरूप होवू शकेल. मराठी आख्यान कवितेच्या रूपसिध्दित व तिच्या विकासात अध्यात्मिकता व कथात्मकतेला अंगभूत महत्व आहे. तिच्यातील प्रमाण जर बदलले वा अन्य आदर्शानुरूप कांही फेरफार केले गेले तर तिच्या एकंदर रचनेवर अनिष्ठ परिणाम होण्याची व तिची काव्यत्मकता कमी होण्याची शक्यता आहे. मराठी आख्यान कवितेच्या रचनेचा व स्वरूपाचा विकास म्हणजे या घटकांच्या कमी जास्त योजनेचा इतिहास, या इतिहासाचा प्रारंभ महदंबेच्या धावळ्यांनी झाला.

## आख्यान काव्य म्हणजे काय ?

महाभारत व पुराणे यातील एखादा कथाभाग निवडून तोच वेगळा रंगवून खुलवून सांगितला गेला असेल म्हणजे मूळ ग्रंथातील एखादे आख्यान वेगळे काढून आणि पुन्हा क्वचित अन्य पुराण भाव जोडून स्वतंत्रपणे व संपूर्णपणे कविता रूपाने सांगितले गेले असेल त्याच कवितेला आख्यान काव्य म्हटले जाते.[१२]

## आख्यान काव्याचे स्वरूप :

महदंबेचे धावळे ही मराठीतील पहिली उपलब्ध आख्यान कविता आहे म्हणून आख्यान कवितेच्या उगमाचा स्त्रोत तिच्यापासून पुढे वहात रहातो. या वाटचालीचा विचार महदंबेपासून करावयाचा तसेच पेशवाईनंतर इंग्रजीपासून आख्यान कवितेच्या प्रयोजनात व त्याचप्रमाणे तिच्या रूपरंगात कधी नव्हे तो फरक पडला. पौराणिक आख्यानाची जागा ऐतिहासिक व सामाजिक कथेने घेतली. कथात्मकता हा प्राणभूत गुण टिकून राहिला. पण कुंटेयांच्या "राजा शिवाजी" पासून मराठी कथा कवितेने वेगळेच आदर्श आपल्यासमोर ठेवले आणि म्हणूनच तेथपासून वेगळा कालखंड मानने योग्य होईल. वस्तुत: आख्यान कवितेचेच ते रूप परिवर्तन आहे -

मराठीचा जन्मकाळ १० व्या ११व्या शतकात झाला असे मानले तर जन्मानंतर एक दोन शतकातच मराठीतील इतर प्रकारच्या लेखनाप्रमाणे आख्यान कवितेने बरेच प्रगत रूप घेतलेले दिसते.

मराठी आख्यान कवितेची परंपरा थेट ऋग्वेदापर्यंत मागे नेता येते. ऋग्वेदात जी संवाद सुक्ते आहेतती एक प्रकारची आख्यान काव्येच आहेत. मात्र त्याची रचना धार्मिक आध्यात्मिक प्रेरणेतून झाली आहे. त्याचप्रमाणे ती गद्य-पद्य मिश्रित आहे. त्यामुळेच ओल्डन बर्ग सारखे विद्वान म्हणतात. त्याप्रमाणे हे सुक्ते नंतरच्या महाकाव्याचे पूर्वरूप दाखवणारी आहेत किंवा मॅक्समुल्लर व सिव्हर लेव्ही म्हणतात. त्याप्रमाणे धर्मकृत्याशी निगडीत असणाऱ्या नाटय प्रयोगातील ते संवाद असोत किंवा या दोन्ही मतांचा समन्वय करून विंटर्निटस् म्हणतात, त्याप्रमाणे ती अर्ध महाकाव्यात्मक अर्धनाटयात्मक असोत,आख्यान हे जिचे गर्मस्थान आहे आणि धार्मिकता व अध्यात्मिकता ही जिंची प्रेरणा आहे अशा आख्यान कवितेचे त्यात पूर्णरूप दिसते. ऋग्वेदात अशी आख्यानात्मक संवाद सुक्ते २० एक तरी आहेत. त्यातील उत्तम उदाहरण म्हणजे 'पुरूरवा उर्वशी' संवाद त्यातील कथाबिजाने तत्कालीन ऋषींचे लक्ष इतके वेधून घेतले आहे, की हिच कथा नंतर शतपत्र ब्राह्मणात येते.

ऋग्वेदाप्रमाणे ब्राह्मण ग्रंथातही अशा अनेक कथा आढळतात. यज्ञपध्दतीचा पुरस्कार हा त्याच्या पाठीमागचा मुख्य हेतू दिसतो. ऐतरेय ब्राह्मणातील "शुन:शेपाख्यान" हे त्याचे उत्तम उदाहरण होय. ब्राह्मणकालानंतरचा काळ "यज्ञयागादी कर्मकांडाचे महत्त्व कमी होऊन गुरूकुलात ज्ञान मिळवण्याचा हा काळ होता. उपनिषदात अत्यंत गहन गुढ तत्वज्ञान सोप्या भाषेत उकलून दाखविले आहे. त्यात प्रसंगवशात कांही आख्यानेही उतरली आहेत. "सत्यकामजाबाला" आख्यान हे त्यापैकी एक छंदोग्योपनिषदात ते आढळते. सत्यनिष्ठेचे श्रेष्ठत्व हे ब्रह्मबीजाचे आहे. मात्र या आख्यानात कथा कथनाचे व विशेषता संवादाचे सहज रम्य सौंदर्य आढळते.

बौध्द व जैन वाङ्.मयातील आख्यानाचे अस्तित्व पहावयास मिळते. किंबहुना वैदिक वाङ्.मयातील कांही कथानांच थोडेफार वेगळे वळण दिले गेले आहे. बौध्द जातके हे त्याचे उदाहरण ठरते. जातक कथा म्हणजे बोधीसत्वाच्या पूर्वजन्मकथा होत.

अशा त-हेने मराठी आख्यान कवितेची परंपरा ही अशी प्रदीर्घ व पुरातन आहे. आख्यान, व्यक्तझाली आहे. धर्मप्रेरणेच्या धाग्यांनी ती विणली गेली आहे. पण त्याबरोबरच रामायणापासून सुरु झालेली व साहित्यिक महाकाव्यांनी अनुसरलेली काव्यात्मक परंपरा ही तिच्यात मिसळली आहे. त्यामुळेच ती अनेक अर्थांनी समृध्द झालेली आहे. इतिहास, पुराणे, आख्याने, उपआख्याने, महाकाव्ये, इत्यादींच्या निर्मितीबरोबर तद्संबंधीच्या टीकाविचारांनी आख्यानात्मक वाङ्.मयाचे धागेदोरे विणण्यात हातभार लावला आहे.

श्रुतिग्रंथातील आख्यानाच्या हेतूहून स्मृती ग्रंथातील आख्यानाचा हेतू थोडाफार वेगळा आहे. आख्यानाच्या एकंदर साधान रुपतेत बदल झाला नाही. हे खरे परंतु कर्मकांडाच्या ऐवजी न्याय-निती इत्यादी मूल्यांना महत्व प्राप्त होताच महाभारतातील कथांच्या स्वरुपावर आवश्यक तो परिणाम झालाच. कौरव पांडवांचे युध्द व त्याच्या अनुषंगाने येणा-या अनेक वीरकथांचे निवेदन एवढा वरवरचा उद्देश येथे दिसला तरी त्यातून क्षत्रिय धर्म व तद्संबंधी श्रेष्ठ मूल्यांचे आदर्श व्यक्त व्हावेत हा हेतू आहे.

मराठी आख्यान कविता जन्माला येण्याआधीच्या आख्यान वाङ्.मयाचे वा आख्यान काव्याचे रुप त्यांच्या प्रयोजनाशी निगडीत होते. त्यात होत गेलेले बदल वा अवस्थानंतर त्यांच्या प्रयोजनाशी निगडीत होते. त्यांची रचना त्यांच्या प्रयोजनांनी आखून दिलेली होती. मराठी आख्यान कविता

जन्माला आली तीही सारी परंपरा जन्माला घेऊन तिने ही परंपरा जशी-च्यातशी सांभाळली व तिच्यात वेगवेगळ्या प्रकारची चैतन्यदायी भर घालून ती अधिक समृध्द झाली.

मराठी आख्यान कविता व धवळे:

मराठी आख्यान कवितेत धवळ्याचे स्थान हे श्रेष्ठ आहे. धवळे हे मराठी साहित्यातील पहिले आख्यान काव्य आहे. या आख्यान काव्यात श्रीकृष्णरुक्मिणी यांची विवाहकथा अत्यंत मनोरम्यपणे गुंफली गेलेली आहे. आध्यात्मिकता आणि कथात्मकता हे तिचे दोन घटक आहेत. एक साध्य दुसरे साधन आहे आणि म्हणूनच मराठीतील खऱ्याखुऱ्या आख्यान काव्याचा पडताळा व्यावसायाचा झाला तर तो खऱ्या अर्थाने तेराव्या शतकातील महदंबेच्या धवळ्यापासूनच घ्यावा लागेल ही धवळ्यापासूनची वाटचाल अठराव्या शतकातील निरंजन माधवांच्या "सुभद्रेचंपू" आख्यान काव्या-पर्यंत सातत्य टिकवून आहे.

आख्यान कवितेत काव्य आणि आख्यान हे वेगवेगळे करता येत नाही, तर त्या दोन्हीनाही तितकेच महत्व असते. प्राध्यापक, डॉक्टर गं.ब. ग्रामोपाध्ये वरील विचार मांडत असताना म्हणतात केवळ पद्यातून एखादे आख्यान सांगितले म्हणजे तेवढयाने त्या आख्यानाला कविता रुप येत नाही. तर जेव्हा एखादी प्रबळ भावना कथानकामागे उभी असते आणि "अथ"पासून "इति"पर्यंत तितक्याच उत्कटपणे टिकून राहते. तेव्हांच ते आख्यान कवितारुपाने व्यक्त होऊ शकते. आख्यान कविता म्हणून खऱ्या अर्थाने तिला संबोधिता येते.[१३] ग्रामोपाध्ये यांच्या मते आख्यान काव्यातील काव्याची उत्कटता आणि प्रबळ भावना याला जास्त महत्व आहे व आख्यान काव्यात त्याला जास्त महत्त्व असते व ते सार्थही आहे.

.....

## प्रकरण चौथे

## संदर्भ साहित्य


१. भारतीय इतिहास संशोधन मंडळ, वि.का. राजवाडे, द्वितीय सम्मेलन वृत्त, पृष्ठ क्रमांक ८१ - ११७.

२. मराठी वाङ्मयाचा इतिहास (संपा) शं.गो. तुळपुळे, मराठी साहित्य परिषद, पुणे, खंड पहिला, पहिली आवृत्ती १९८४, पृ.क्र. ५९.

३. उ.नि.

४. उ. नि.

५. उ. नि.

६. लीळाचरित्र एकांक (संपा) शं.गो. तुळपुळे, सुविचार प्रकाशन, पुणे, लीळा क्रमांक ४६.

७. श्रीचक्रधर-दर्शन, मुंबई, १९८२, पृ.क्र. २७९, २९३.

८. श्रीचक्रधर चरित्र, (संपा) वि.भि. कोलते, अरुण प्रकाशन, मलकापूर, १९५२, पृ.क्र. १९९ ते २१३.

९. आद्य मराठी कवयित्री-महदंबा (संपा) वा.ना. देशपांडे, अ.ना.कुलकर्णी, कॉण्टिनेंटल प्रकाशन, टिळक रोड, पुणे-२, द्वितीय आवृत्ती, १९५६.

१०. मराठी आख्यान कविता - एक अभ्यास, ग.ब. ग्रामोपाध्ये, महाराष्ट्र राज्य, साहित्य संस्कृती मंडळ, पुरस्कृत, प्रथमावृत्ती, १९७०, पृ.क्र. १२, आख्यान दुसरे.

११. श्रीगोविंदप्रभुचरित्र, (संपा) व.दि. कुलकर्णी, व्हिनस प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, १९८०, लीळाक्रमांक २२४.

१२. मराठी आख्यान कविता एक अभ्यास, गं.ब. ग्रामोपाध्ये , महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, पुरस्कृत, प्रथमावृत्ती, १९७०, आख्यान पहिले, पृष्ठ क्र.२.

१३. मराठी आख्यान कविता एक अभ्यास, गं.ब. ग्रामोपाध्ये , प्रास्ताविक निवेदन, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ पुरस्कृत, प्रथमावृत्ती, १९७०, पृष्ठ क्र.५.

.....